MHSN130004452022

**नियमित दिवाणी मुकदमा क्र. १५४/२०२२**
**निशाणी क्र. २५ वरील आदेश**
**(युवराज गोतपागर वगैरे वि. जितेंद्र गोतपागर वगैरे)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी वादी यांचेविरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याच्या अंतीम निकालापावेतो तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे, मौजे सोनकिरे, ता. कडेगांव, जि. सांगली येथील गट क्र. ६४४ अशाप्रकारे दावा व अर्ज कलम १ मध्ये विस्तृतपणे नमूद केलेली जमीन मिळकत ही या अर्जाचा विषय असून त्यांना दावा मिळकत असे संबोधले आहे.

३. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे वर नमूद दावा मिळकती ही त्यांची वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीची मिळकत आहे. वादी यांचा दावा मिळकतीशी काही संबंध नसताना ते प्रतिवादीशी अरेरावीची भाषा करून त्यांच्या मिळकतीमध्ये वहिवाट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी हे दावा मिळकतीमध्ये जाणूनबुजून जनावरांचे शेड उभा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी यांनी वादी यांना त्यांच्या मिळकतीमध्ये ये जा करणेस व शेड बांधण्यास मनाई केली असता त्यांनी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. दि. ३०.०३.२०२२ रोजी प्रतिवादी यांनी

वादी यांचेविरूध्द तंटामुक्ती अध्यक्ष सोनकिरे यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. त्यावेळेस वादी यांना प्रतिवादी यांच्या गट नं. ६४४ मध्ये न जाण्यास व शेड उभा न करणेस सांगितले असता वादी हे सदर मिळकतीमध्ये वहिवाट व शेड बांधण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी यांनी गट नं. ६४० ला गट नं. ६४४ च्या चतुःसिमा नमूद केलेल्या आहेत. म्हणून प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल करून त्यांनी वादी यांनी स्वतः अगर अन्य इसमामार्फत सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचे शांततामय कब्जेवहिवाटीस दाव्याच्या अंतीम निकालापावेतो हरकत अडथळा करू नये अशी तूर्तातुर्त मनाईची विनंती केली आहे.

४. वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ३० वर दाखल करून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वादी यांच्या कथनाप्रमाणे, वादी यांचा दावा गट नंबर ६४० बाबत असून सदरचा प्रतिदावा दाखल करणेचा अधिकार कायद्यानुसार प्रतिवादी यांना आहे. प्रतिवादी यांना दावा दाखल करणेस कोणताही अधिकार नाही. प्रतिदाव्यातील मिळकतीच्या चतुःसीमा वेगळ्या आहेत व त्या वादी यांना मान्य व कबूल नाहीत. प्रतिवादी यांनी वादी यांची गट नं. ६४० ची मालकी व वहिवाट मान्य केलेली आहे. वादी यांनी प्रतिदाव्यामधील मिळकतीत कधीही ये जा केलेली नाही अगर शेड बांधण्याचा प्रयत्न केलेली नाही. वादी यांचे गट नं. ६४० म्हणजेच दावा मिळकतीत राहते घर व शेड आहे. तसेच नवीन घराचे पक्के foundation केलेले आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. त्यामुळे वादी यांनी

प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज फेटाळून लावण्यात यावा अशी विनंती केलेली आहे

५. प्रतिवादी व वादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीस सकृतदर्शनी केस आहे का? | होय. |
| २. | न्यायाचे व सोयीचे समतोलत्व कोणाच्या बाजूने आहे ? | प्रतिवादीचे |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास कशानेही न भरुन येणारे असे नुकसान कोणाचे होईल ? | प्रतिवादीचे |
| ४. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

६. प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी खालील कागदोपत्री पुराव्याचा आधार घेतला आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्र** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील गट नं. ६४० व ६४४ चा नकाशा | २१/१ व २ |
| २. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील मिळकत क्र. ६३९, ६४१, ६४३/अ, ६४४, ६४५ चा ७/१२ उतारे | २१/३ ते ७ |

| | | |
|---|---|---|
| ३. | तक्रार अर्ज | २१/८ |
| ४. | गट नं. ६३८ चा उतारा | ४८/१ |

७. वादी यांनी सदर अर्जाचे कामी खालील कागदोपत्री पुराव्याचा आधार घेतला आहे.

| अ.क्र. | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील गट नं. ६४० चा ८ अ चा उतारा | ३/१ |
| २. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील मिळकत क्र. ६४० चा ७/१२ उतारे | ३/२ ते ४ |

८. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. एस. पाटील व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती जी. एम. पोतदार यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र. १ करीता

९. सदर मुद्दयासंदर्भात प्रतिवादीस या अर्जाचेकामी सकृतदर्शनी केस आहे का ? हे पाहत असताना सकृतदर्शनी वादी यांनी प्रतिवादी यांच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला का ? हे पाहणे आवश्यक आहे.

१०. प्रतिवादी यांच्या वकीलांनी असा युक्तिवाद केला की, वादी दावा

मिळकतीमध्ये अनेक वेळा येजा करत असतात. तसेच ते दावा मिळकतीमध्ये वहिवाट करून शेड बांधण्याचा प्रयत्न करू लागले त्यावेळी प्रतिवादी यांनी विरोध केला असता वादी यांनी अरेरावीची भाषा करून भांडण सुरू केले. त्यानंतर प्रतिवादी यांनी तंटामुक्ती अध्यक्ष मौजे सोनकिरे तालुका कडेगाव येथे दिनांक ३०.०३.२०२२ रोजी वादी यांच्याविरुद्ध तक्रार दिली. वादी हे प्रतिवादी यांच्या मिळकतीला स्वतःची मिळकत समजत आहे

११. वादी यांच्या वकीलांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी यांना प्रतिदावा दाखल करण्याचा लोकल स्टँडिंग नाही, तसेच दाव्याचे कारण वेगळे आहे. वादी यांची त्यांच्या गट नंबरमध्ये त्यांची राहते घर व शेड आहे. तसेच नवीन घराचे पक्के फाउंडेशन केले आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काही एक हक्क संबंध नाही. वादी यांनी प्रतिवादी यांच्या कब्जेवहिवाटीत कधीही हरकत अडथळा केला नाही. वादी यांनी दावा दाखल केला म्हणून प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल करून सदरचा अर्ज दाखल केला आहे.

१२. अभिलेखावर दाखल गट नंबर ६४४ सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता, त्यावर प्रतिवादी क्रमांक १ व ४ यांच्या नावाची नोंद दिसून येते. सदर कामी गट नंबर ६४४ प्रतिवादी यांचा आहे याबाबत वाद नाही. अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरून दावा मिळकतीला लागून वादी यांची मिळकत नाही. अभिलेखावरील दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जाचे अवलोकन केले

असता, वादी दावा मिळकतीमध्ये कोणताही संबंध नसताना अरेरावी करून वहिवाट करत आहेत, तसेच जमिनीमध्ये शेड उभा करीत आहेत असा मजकूर असल्याचे दिसून येते.

१३. वादी यांनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी त्यांना दि. ०१.०६.२०२२ रोजी हरकत अडथळा केल्याचे नमूद केलेले आहे. वरील गोष्टींचा विचार करता प्रथमदर्शनी वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडे हरकत अडथळा केल्याचे दिसून येते. तसेच वादी दावा मिळकतीत जनावरांसाठी शेड उभा करीत आहेत हे दाखवण्यासाठी प्रतिवादी यांनी कोणताही कागदपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. वादी यांनी दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये वादी हे गट नंबर ६४० मध्ये नवीन घराचे पक्के फाउंडेशन केले आहे असे कथन केले आहे. त्यामुळे वादी बांधकाम कोणत्या क्षेत्रात करत आहेत हे स्पष्ट होत नाही. परंतु वादी बांधकाम करत असल्याबाबतचे कथन सकृतदर्शनी विश्वास पात्र दिसते.

१४. वादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी दावा दाखल केला म्हणून प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल करून सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना सदरचा दावा दाखल करता येत नाही. तसेच दावा मिळकत वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे प्रतिदावा चालण्यास पात्र नाही. या बाबी पुराव्याअंती पाहणे योग्य व उचित होणार आहे.

१५. प्रतिवादी यांनी गट नंबर ६४० ते ६३३ चे एकत्रीकरण नकाशा, तसेच गट नंबर ६४० व ६४४ चा नकाशा या कामी दाखल केला आहे. तसेच गट नंबर ६४० मध्ये वादी यांची घरे आहेत याबाबत कोणताही पुरावा या कामी दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत वर नमूद केलेप्रमाणे दावा मिळकतीत वादी जनावरांसाठी शेड उभा करत आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच दिनांक ३०.०३.२०२२ रोजीचा तक्रार अर्ज प्रतीवादी यांच्या कथनांना पूरक असा आहे. यावरून वादी हे प्रतिवादी यांच्या कडे हरकत अडथळा करतात असे सकृतदर्शनी दिसते. तसेच प्रतिवादी यांना सकृतदर्शनी केस आहे असे स्पष्ट होते. सबब या अर्जाचे कामी प्रतिवादींना सकृतदर्शनी केस असल्याने मुद्दा क्रमांक १ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

## <u>मुद्दा क्र. २ व ३ करीता</u>

१६. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतरित्या विचारासाठी घेतले आहेत.

१७. सकृत दर्शनी दावा मिळकतीत प्रतीवादींचा कब्जा आहे हे स्पष्ट झालेला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीचा दावा मिळकतीशी काही एक हक्क नाही असे केलेले कथन हे वादी प्रतिवादी यांच्या कब्जास हरकत करतात असे मानण्यास पुरेसे आहे. तसेच वादी यांनी प्रतिवादी यांना दावा मिळकतीतून हुसकावून लावल्यास

अथवा दावा मिळकतीचा ताबा घेवून शेडचे बांधकाम केल्यास प्रतिवादी यांना त्यांच्या असणाऱ्या हक्कास मुकावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रस्थापित परिस्थितीत काहीच बदल होत नाही व प्रतिवादींचा कब्जा सुरक्षित राहील. याउलट प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास प्रस्थापित परिस्थितीत बदल होऊन प्रतिवादी कब्जा पासून दूर जाऊ शकतात. सबब सोयीचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व हे देखील प्रतिवादींच्या बाजूने आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ व ३ बाबत वरीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहेत.

## **मुद्दा क्र. ४ करीता**

१८. उपलब्ध पुराव्यावरून तसेच दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांच्या युक्तिवादावरून सकृतदर्शनी पाहता प्रतिवादी यांना सकृतदर्शनी कथन असल्याचे स्पष्ट झाल्याने प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. प्रस्तुत अर्जाच्याकामी केलेली कथने या अर्जापुरतीच मर्यादित आहेत. तसेच याकामी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवर आधारित आहेत. त्यामुळे मूळ दाव्याच्या चौकशीवेळी दोन्ही बाजूंचे पक्षकार या अर्जावरील आदेशाचा आधार घेऊ शकत नाहीत. सबब मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष दाखल खालील आदेश पारीत करत आहे.

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | वादी यांनी स्वतः अगर अन्य इसमामार्फत सदर/दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचे शांततामय कब्जेवहिवाटीस दाव्याच्या अंतीम निकालापावेतो हरकत अडथळा करू नये, तसेच दावा मिळकतीतून हुसकावून लावू नये व शेड बांधकाम करू नये अशी वादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीद देण्यात येत आहे. |

**स्वाक्षरीत**

**(चंद्रकांत रा. पाटील)**

दि. २२/११/२०२३

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कडेगांव.